THE

Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 1st MARCH 1894.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

# PART IX.—Marathi Acts, &c.

## तुरुंगांसबंधी कायदा सुधारण्याबाबत आक्टाचा मसुदा.

**ब्रिटिश हिंदुस्थानांतील तुरुंगांसंबंधीं कायदा सुधारणें आणि अशा तुरुंगांचें नियमन करण्यासाठीं कानू करणें ज्या अर्थी इष्ट आहे, त्या अर्थी लिहिल्याप्रमाणें कायदा करण्यांत येत आहे:—**

### बाब १.

### प्रथमारंभींचे ठराव.

१. (१) ह्या कायद्यास सन १८९४ चा तुरुंगांबाबत आक्ट असें ह्मणावें. सरनामा, व्याप्ति व सुरुवात.

(२) तो, उत्तर ब्रह्मदेश, ब्रिटिश बलुचिस्थान, सांतल परगणे, चितगांगचे पहाडी प्रदेश, छोटा नागपुर डिव्हिजन, तराई परगणे, स्पिटीचा परगणा, आणि गंजमच्या व विजगापट्टणच्या जमिनदारी व अमानी इस्टेटी हे सर्व प्रदेश आणि कलकत्ता, मद्रास व मुंबई हीं इलाका शहरें धरून सगळ्या ब्रिटिश हिंदुस्थानास लागू आहे.

(३) तो, तारीख माहे सन रोजीं अमलांत येईल.

२. (१) त्या दिवशीं व त्या दिवसानंतर, परिशिष्टांत सांगितलेले कायदे, त्या परिशिष्टाच्या तिसऱ्या आसनांत निर्दिष्ट केलें आहे तेथवर रद्द होतील. रद्द करणें.

(२) परंतु सदर्हू कायद्यांपैकीं कोणत्याही कायद्याअन्वयें केलेल्या कोणत्याही कानू व नेमणुका केलेल्या आज्ञा, आणि सोडलेले हुकुम, हीं कृत्यें ह्या आक्टास अनुसरून असतील तेथवर, ह्या आक्टाअन्वयें करण्यांत आलीं आहेत असें समजावें.

(३) ज्या कोणत्याही कायद्यांत अगर दस्तऐवजांत सदर्हू कायद्यांपैकीं कोणत्याही कायद्यावर हवाला दिलेला असेल, तो कायदा अगर दस्तऐवज, जमेल तेथवर, ह्या आक्टाचा अगर ह्या आक्टाच्या जुळत्या भागाचा हवाला देत आहे असें समजावें.

३. ह्या आक्टांत,— व्याख्या.

(१) "तुरुंग" ह्या शब्दाचा अर्थ, कोणताही सेंट्रल जेल (मुख्य तुरुंग) अगर डिस्ट्रिक्ट जेल, अगर टेंपररी जेल (हंगामी तुरुंग) अगर हौस

आफ् करेक्शन (हलक्या सजेच्या कैद्यांकरितां बंदीखाना) अगर पेनिटेन्शियरी (शासन गृह), असा समजावा; आणि त्या शब्दांत त्या तुरुंगासंबंधीं अगर त्या तुरुंगाच्या उपयोगासाठीं भोगवट्यांत असलेल्या सर्व जमिनींचा अगर इमारतींचा समावेश होतो, परंतु त्यांत, सबसिडियरी जेलाचा किंवा सन १८८२ चें क्रिमिनल प्रोसीजर कोड, कलम ५४१, ह्याअन्वयें स्थानिक सरकारानें मुद्दाम नेमिलेल्या (तुरुंग शिवाय करून) इतर जागेचा समावेश होत नाहीं; मात्र, ह्या आक्टाच्या ठरावांपैकीं कोणताही ठराव अगर ह्या आक्टाअन्वयें केलेल्या कानूंपैकीं कोणतीही कानू ह्या आक्टाच्या ५८ व्या कलमाखालीं केलेल्या कानूंअन्वयें ज्या सब्सिडियरी जेलास अगर सदर्हू प्रकारच्या जागेस लागू केली असेल त्या सबसिडियरी जेलाचा अगर जागेचा "तुरुंग" ह्या शब्दांत समावेश होतो असें समजावें.

(२) "सब्सिडियरी जेल" ह्या संज्ञेचा अर्थ, सेंट्रल जेल अगर डिस्ट्रिक्ट जेल नसलेल्या ज्या तुरुंगांत फक्त दिवाणी कैदी अगर शाबितीचा ठराव न झालेले फौजदारी कैदी अगर अशा दरेक तुरुंगाच्या बाबतींत स्थानिक सरकार जी मुदत ठरवील त्या मुदतीपेक्षां ज्यास्त नाहीं अशा मुदतीची कैदेची शिक्षा झालेले फौजदारी कैदी अटकेंत ठेवण्यांत येतात, तो तुरुंग, असा समजावा; मात्र, ज्या प्रसंगीं सदर्हू मुदतीपेक्षां ज्यास्त मुदतीच्या शिक्षेच्या कैद्यांस, सेंट्रल जेलास अगर डिस्ट्रिक्ट जेलास पाठविण्यासाठीं अगर कैद्यांवरील कामगार अगर हलके नोकर लोक ह्मणून पाठविण्यासाठीं सब्सिडियरी जेलांत कांहीं कालपर्यंत ठेवणें जरूर असेल त्या प्रसंगास सदर्हू व्याख्या लागू करूं नये.

(३) "फौजदारी कैदी" ह्या संज्ञेचा अर्थ, कोणताही अपराध केल्याचा आरोप ठेविलेला अगर कोणताही अपराध केल्याच्या शाबितीचा ठराव ज्यावर झाला आहे असा कैदी अगर क्रिमिनल प्रोसीजर कोडाच्या ठरावांअन्वयें अगर कोणत्याही कोर्ट मार्शलाच्या हुकुमाअन्वयें कैदेंत ठेविलेला कैदी, असा समजावा.

(४) "शाबितीचा ठराव झालेला फौजदारी कैदी" ह्या संज्ञेचा अर्थ, कोणत्याही कोर्टाच्या अगर कोर्ट मार्शलच्या शिक्षेखालीं असलेला कोणताही फौजदारी कैदी असा समजावा; आणि त्या संज्ञेंत, सन १८८२ चें क्रिमिनल प्रोसीजर कोड, ह्याच्या ८ व्या बाबतींतल्या ठरावांअन्वयें तुरुंगांत अटकेंत ठेविलेल्या मनुष्याचा समावेश होतो.

(५) "दिवाणी कैदी" ह्या संज्ञेचा अर्थ, वर व्याख्या केल्याप्रमाणें फौजदारी कैदी नाहीं असा कोणताही कैदी असा समजावा.

(६) "माफीची पद्धत" ह्या संज्ञेचा अर्थ, तुरुंगांतल्या कैद्यांस मार्क (गुण) देऊन त्यांवरून त्या कैद्यांच्या शिक्षा कमी करण्याच्या कामाचें नियमन करण्याकरितां विवक्षितकाळीं अमलांत असलेल्या कानू, असा समजावा; आणि

(७) "हकीकतीचें तिकिट" ह्या संज्ञेचा अर्थ, ह्या आक्टाअन्वयें अगर ह्या आक्टाखालीं केलेल्या कानूंअन्वयें कोणत्याही कैद्याच्या संबंधानें जी माहिती पाहिजे असेल त्या माहितीची त्या कैद्यानें आपल्या जवळ ठेवावयाची नोंद, असा समजावा.

## बाब २.

### तुरुंगांची व्यवस्था व त्यांचे अमलदार यांबाबद.

४. स्थानिक सरकारानें, आपल्या ताब्यांतील मुलुकांतल्या कैद्यांसाठीं, तुरुंगांमध्यें, कैद्यांस निरनिराळें ठेवण्याच्या संबंधानें ह्या आक्टांत जे ठराव आहेत त्यांवरहुकूम बांधिलेल्या व नियमन केलेल्या राहावयाच्या जागा पुरवल्या पाहिजेत. कैद्यासाठीं राहावयाच्या जागा.

५. (१) इन्स्पेक्टर जनरल आफ प्रिझन्स ह्यांस जेव्हां जेव्हां असें दिसून येईल कीं, कोणत्याही तुरुंगांतील कैद्यांची संख्या, त्या तुरुंगांत सोईनें किंवा बंदोबस्तानें ठेवतां येईल त्यापेक्षां ज्यास्त आहे, आणि ती ज्यास्त असलेली कैद्यांची संख्या दुसऱ्या एकाद्या तुरुंगांत नेऊन ठेवणें सोईचें नाहीं, तेव्हां तेव्हां, कैद्यांस हंगामी रीतीनें राहावयाची जागा.

अगर जेव्हां जेव्हां कोणत्याही तुरुंगांत एकादी रोगाची सांत आल्यामुळें अगर इतर कोणत्याही कारणामुळें कोणत्याही कैद्यांस कांहीं कालपर्यंत राहाण्यासाठीं आणि त्यांस बंदोबस्तानें अटकेंत ठेवण्यासाठीं दुसऱ्या एकाद्या जागेची तजवीज करणें जरूर असेल, तेव्हां तेव्हां,

सदर्हू अमलदारानें, त्या तुरुंगांत जितक्या कैद्यांस सोईनें अगर बंदोबस्तानें ठेवतां येण्यासारखें नसेल तितक्या कैद्यांस हंगामी रीतीनें राहण्यासाठीं आणि त्यांस बंदोबस्तानें अटकेंत ठेवण्यासाठीं, स्थानिक सरकार वेळोवेळीं ठरवील त्या रीतीवरहुकुम जागेची तजवीज केली पाहिजे.

(२) ज्या कैद्यांसाठीं अशा हंगामी जागेची तजवीज केली असेल, त्यांस, ते तुरुंगांत असल्याप्रमाणेंच, कानू लागू राहतील.

६. दरेक स्थानिक सरकाराच्या अमलाखालील मुलुखाकरितां एक इन्स्पेक्टर जनरल आफ प्रिझन्स नेमिला पाहिजे, आणि त्या इन्स्पेक्टर जनरल आफ प्रिझन्स ह्यानें, त्या सरकाराच्या अमलाखालील प्रदेशांत असलेल्या सर्व तुरुंगावर, त्या सरकारच्या हुकुमांस अनुसरून, निर्बंध आणि देखरेख ठेविली पाहिजे: इन्स्पेक्टर जनरल आफ् प्रिझन्स.

मात्र इतकेंच कीं, मुंबई इलाख्यांतील दिवाणी तुरुंगांची व्यवस्था, सन १८७४ चा मुंबईचा आक्ट २ रा ह्याच्या ८ ते १६ ह्या कलमांतील ठरावांस अनुसरूनच होत राहील.

७. दरेक तुरुंगाकरितां, एक सुपरिंटेंडंट, एक मेडिकल आफिसर (हा सुपरिंटेंडंटचाही हुद्दा धारण करूं शकेल), एक जेलर, आणि स्थानिक सरकारास जरूर वाटेल ते इतर अमलदार असतील. तुरुंगाचे अमलदार.

मात्र इतकेंच कीं, मुंबई इलाख्यांतील विवक्षित तुरुंगांमध्यें, सुपरिंटेंडंट म्हणून नेमिलेल्या मनुष्यानेंच जेलरच्या हुद्याचें काम करावें असें ठरविण्याचा त्या इलाख्याच्या सरकारास अधिकार आहे.

---

## बाब ३.

### अमलदारांच्या कामांबाबद.

#### सामान्य.

८. तुरुंगाच्या सर्व अमलदारांनीं सुपरिंटेंडंटाच्या हुकुमाप्रमाणें वागलें पाहिजे; सर्व ताबेदार अमलदारांनीं, सुपरिंटेंडंटाच्या मंजुरीनिशीं जेलर जीं कामें सांगेल तीं केलीं पाहिजेत; दरेक ताबेदार अमलदारानें करावयाचीं कामें एका बुकांत दाखल केलीं पाहिजेत, आणि हें बुक त्या अमलदारानें आपल्या जवळ ठेविलें पाहिजे. निर्बंध, आणि तुरुंगांच्या अमलदारांचीं कामें.

अमलदारांनीं कैद्यांस कोणतीही वस्तु विकूं वगैरे नये.

९. तुरुंगाच्या कोणत्याही अमलदारानें अगर त्याचा जिम्मा धारण करणाऱ्या अगर त्यानें नोकरीवर ठेविलेल्या कोणत्याही मनुष्यानें कोणत्याही कैद्यास कोणतीही वस्तु विकूं नये अगर भाड्यानें देऊं नये अगर कोणतीही वस्तु विकून अगर भाड्यानें देऊन आपला कोणताही फायदा करून घेऊं नये.

अमलदारांनीं मक्ता वगैरे घेऊं नये.

१०. तुरुंगाच्या कोणत्याही अमलदारानें अगर त्याचा जिम्मा धारण करणाऱ्या अगर त्यानें नोकरीवर ठेविलेल्या कोणत्याही मनुष्यानें. तुरुंगास सामान पुरवावयाच्या कोणत्याही मक्त्यांत प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष रीतीनें आपला हितसंबंध ठेवूं नये; त्याचप्रमाणें, त्यानें, तुरुंगांच्या संबंधानें कोणतीही वस्तु विकण्यांत अगर खरेदी घेण्यांत किंवा एकाद्या कैद्याच्या मालकीची वस्तु विकण्यांत अगर खरेदी घेण्यांत प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष रीतीनें आपला कोणताही फायदा करून घेऊं नये.

## सुपरिंटेंडंट.

सुपरिंटेंडंट.

११. (१) सुपरिंटेंडंटाचें काम हें आहे कीं, त्यानें, इन्स्पेक्टर-जनरल आफ् प्रिझन्स ह्यांच्या हुकुमांस अनुसरून, शिस्तीच्या संबंधाच्या, कैद्यांकडून काम करवून घेण्याच्या संबंधाच्या, खर्चाच्या संबंधाच्या, कैद्यांस करावयाच्या शिक्षेच्या संबंधाच्या आणि निर्बंधासंबंधाच्या सर्व बाबतींत तुरुंगाची व्यवस्था ठेविली पाहिजे.

(२) स्थानिक सरकार वेळोवेळीं हुकुम फर्मावील त्यांस अनुसरून, सेंट्रल जेल अगर इलाखा-शहरांतला कोणताही तुरुंग शिवाय करून इतर कोणत्याही तुरुंगाच्या सुपरिंटेंडंटानें, त्या तुरुंगासंबंधानें जिल्हा माजिस्ट्रेट जे कायदेशीर हुकुम करील ते सर्व मानिले पाहिजेत, आणि अशा हुकुमांबद्दल व त्या हुकुमांस अनुसरून केलेल्या तजविजीबद्दल इन्स्पेक्टर जनरल आफ् प्रिझन्स ह्यांकडे रिपोर्ट केला पाहिजे.

## मेडिकल आफिसर.

मेडिकल आफिसराचीं कामें.

१२. मेडिकल आफिसराच्या हातीं तुरुंगाची आरोग्यरक्षणसंबंधी व्यवस्था राहील; आणि कलम ५९ अन्वयें स्थानिक सरकारानें करावयाच्या कानूंत जीं कामें त्यानें करावीं ह्मणून सांगण्यांत येईल तीं कामें त्यानें केलीं पाहिजेत.

कांहीं बाबतींत मेडिकल आफिसरानें रिपोर्ट केला पाहिजे.

१३. ज्या कोणत्याही कैद्याला ज्या कोणत्याही शिस्तींत ठेविलेलें असेल अगर त्याला ज्या रीतीनें वागविण्यांत येत असेल, त्या कैद्याच्या मनावर त्या शिस्तीपासून अगर वागविण्याच्या रीतीपासून अपायकारक परिणाम होत आहे अगर तसा परिणाम होण्याचा संभव आहे असें जेव्हां जेव्हां मेडिकल आफिसरास वाटण्यास कारण असेल तेव्हां तेव्हां, त्या आफिसरानें त्याबद्दल सुपरिंटेंडंटाकडे रिपोर्ट करावा, आणि त्याबरोबर, आपल्यास योग्य वाटतील ते त्या संबंधाचे आपले विचार लिहून कळवावे.

कैदी मयत झाल्यावर रिपोर्ट.

१४. कोणताही कैदी मयत झाला ह्मणजे, मेडिकल आफिसरानें, तावडतोब, खालीं नमूद केलेल्या गोष्टींबद्दलची माहिती लिहून ठेविली पाहिजे:—

(१) मयत आजारी केव्हां झाला;

(२) त्याच्या आजाराबद्दल मेडिकल आफिसरास पहिल्यानें केव्हां कळविलें;

(३) आजाराचा प्रकार;

(४) कैदी केव्हां मयत झाला; आणि

(५) (कैदी मेल्यानंतर त्याचें प्रेत तपासलें असल्यास) कैदी मेल्यानंतर त्याचें प्रेत कसें दिसत होतें.

ह्या माहितीबरोबरच, त्या मेडिकल आफिसरास जें काहीं मुद्दाम लिहावेंसें वाटेल तें त्यानें लिहून ठेवावें.

## जेलर.

१५. (१) जेलरनें तुरुंगांत राहिलें पाहिजे; मात्र सुपरिंटेंडट ह्यानें त्यास इतर जागीं राहाण्याची लेखी परवानगी दिली तर त्यास इतर ठिकाणीं राहातां येईल. *जेलर.*

(२) इन्स्पेक्टर जनरलाच्या मंजुरीशिवाय जेलरनें दुसऱ्या कोणत्याही कामाशीं आपला संबंध ठेवूं नये.

१६. कोणताही कैदी मयत झाल्यावरोबर जेलरनें त्याबद्दलची सूचना, तावडतोब, सुपरिंटेंडटाकडे आणि मेडिकल आफिसराकडे पाठविली पाहिजे. *कैदी मयत झाल्याची सूचना जेलरनें दिली पाहिजे.*

१७. जेलरनें खालीं लिहिलेलें दप्तर ठेविलें अगर ठेवाविलें पाहिजे :— *जेलरनें दप्तर ठेविलें पाहिजे.*

(१) तुरुंगांत दाखल केलेल्या कैद्यांचें रजिस्टर;

(२) दरेक कैद्यास केव्हां सोडावयाचें तें दाखविणारें एक बूक;

(३) तुरुंगांतील अपराधांवद्दल कैद्यांस केलेल्या शिक्षा नोंदून ठेवण्याकरितां शिक्षांचें बूक;

(४) तुरुंगांत येणाऱ्या विजिटरांनीं लिहिलेला आपला अभिप्राय नोंदण्यासाठीं एक विजिटरचें बूक;

(५) कैद्यांपासून घेतलेल्या पैशाचा व इतर जिन्नसांचा लेखी दाखला;

आणि, कलम ५८ अगर कलम ५९ ह्यांअन्वयें केलेल्या कानूंमध्यें जें इतर कोणतेंही दप्तर ठेवावयास सांगितलें असेल तें सगळें दप्तर.

१८. कलम १७ अन्वयें जें दप्तर जेलरनें ठेविलें पाहिजे तें दप्तर सुरक्षित ठेवण्याबद्दल आणि त्याचप्रमाणें त्याच्या स्वाधीन केलेलीं कमिटमेंट वारंटें आणि इतर सर्व कागदपत्र सुरक्षित ठेवण्याबद्दल आणि कैद्यांकडून घेतलेला पैसा व इतर जिन्नस सुरक्षित ठेवण्याबद्दल जेलर जबाबदार राहील. *जेलरची जबाबदारी.*

१९. सुपरिंटेंडटाची लेखी परवानगी असल्याशिवाय जेलरनें कोणत्याही रात्रीं तुरुंगांतून गैरहजर राहूं नये; परंतु, कोणत्याही अनिवार्य कारणामुळें तो जर कोणत्याही रात्रीं तुरुंगांतून गैरहजर राहिला, तर त्यानें, आपण गैरहजर राहिल्याची गोष्ट आणि गैरहजर राहण्याचें कारण सुपरिंटेंडटास तावडतोब कळविलें पाहिजे. *जेलरनें रात्रीं हजर असलें पाहिजे.*

२०. कोणत्याही मनुष्यास कोणत्याही तुरुंगाचा डेप्युटी जेलर नेमिलें ह्मणजे तो, ह्या आक्टांत अगर कलम ५८ अगर कलम ५९ ह्याअन्वयें केलेल्या कानूंत जेलरनें करावयाचीं ह्मणून सांगितलेलीं कामें करण्यास मुखत्यार होईल. *डेपुटी जेलरचे अधिकार.*

## ताब्यांतील अमलदार.

२१. दरवाजेवाल्याचें काम करणाऱ्या अमलदारास अगर तुरुंगाच्या दुसऱ्या कोणत्याही अमलदारास, तुरुंगांत अगर तुरुंगांतून बाहेर नेण्यांत येत असलेला कोणताही जिन्नस तपासून पाहाण्याचा, आणि ज्या कोणत्याही मनुष्याबद्दल, तो दारू अगर इतर मनाईचे पदार्थ तुरुंगांत नेत आहे असा संशय असेल अगर तुरुंगाच्या मालकीची कोणतीही मिळकत तुरुंगाबाहेर नेत आहे असा संशय असेल, त्यास थांबवून त्याचा झाडा घेण्याचा अखत्यार आहे; आणि सदहू प्रकारचे कोणतेही जिन्नस अगर मिळकत सांपडली, तर त्यानें त्याबद्दल सुपरिंटेंडट ह्यांस तावडतोब कळविलें पाहिजे. *दरवाजेवाल्याचीं कामें.*

२२. ताब्यांतील अमलदारांनीं, सुपरिंटेंडटाकडून अगर जेलराकडून रजा घेतल्याशिवाय तुरुंगांतून गैरहजर राहूं नये; आणि गैरहजर राहाण्याच्या आधीं त्यांनीं आपल्याजवळ असलेल्या तुरुंगाच्या किल्ल्या जेलरच्या कचेरींत आणून दिल्या पाहिजेत. *ताब्यांतील अमलदारांनीं रजेशिवाय गैरहजर राहूं नये.*

## बाब ४.

### कैद्यांस तुरुंगांत दाखल करण्याबाबद, दुसऱ्या तुरुंगांत पाठविण्याबाबद, आणि सोडण्याबाबद.

*कैद्यास तुरुंगांत दाखल केल्याबरोबर त्यास तपासलें पाहिजे.*

२३. (१) कोणत्याही कैद्यास तुरुंगांत पहिल्यानें दाखल केलें ह्मणजे आणि त्याचप्रमाणें त्यानंतर जेव्हां जेव्हां त्यास तुरुंगांत दाखल करण्यांत देईल तेव्हां तेव्हां, त्याचा झाडा घेतला पाहिजे, आणि त्याजवळ असलेलीं सर्व शस्त्रें आणि मनाईचे जिन्नस त्याजवळून काढून घेतले पाहिजेत.

(२) त्याचप्रमाणें दरेक फौजदारी कैद्यास, त्याला तुरुंगांत दाखल केल्यानंतर जमेल तितकें लवकर, मेडिकल आफिसरानें तपासून, त्याची प्रकृती कशी काय आहे ह्याबद्दल, त्याच्या शरीरावर कांहीं जखमा अगर खुणा असल्यास त्यांबद्दल आणि त्यास सक्त मजुरीच्या कैदेची शिक्षा दिलेली असल्यास तो कोणत्या प्रकारची मजुरी करण्यास लायक आहे ह्याबद्दल, जेलरनें ठेवावयाच्या एका बुकांत नोंद केली पाहिजे; आणि ह्या नोंदीशिवाय जे कांहीं इतर विचार दाखल करणें त्या आफिसरास योग्य वाटेल, ते विचारही त्यानें त्या बुकांत लिहून ठेविले पाहिजेत.

(३) स्त्री जातीच्या कैद्यांच्या बाबतींत, झाडा घेण्याचें आणि तपासण्याचें काम, मेडिकल आफिसराच्या हुकुमांप्रमाणें मेट्रननें केलें पाहिजे.

*कैद्यांची मालमत्ता.*

२४. ज्या पैशाच्या संबंधानें अगर इतर जिन्नसांच्या संबंधानें कोणत्याही योग्य कोर्टाकडून कोणताही हुकुम झालेला नसून जो पैसा अगर जिन्नस तुरुंगांत आणण्यास कोणत्याही फौजदारी कैद्यास अधिकार असेल अगर त्याच्या उपयोगासाठीं तुरुंगांत पाठवितां येत असेल, तो सगळा पैसा आणि ते सर्व जिन्नस जेलरच्या ताब्यांत दिले पाहिजेत.

*कैद्यांस दुसऱ्या तुरुंगांत पाठवणें अगर सोडून देणें.*

२५. (१) कोणत्याही कैद्यास दुसऱ्या तुरुंगांत पाठविण्याच्या आधीं त्यास मेडिकल आफिसरानें तपासलें पाहिजे.

(२) कोणत्याही कैद्यास दुसऱ्या तुरुंगांत पाठविणें तें, त्याला त्याप्रमाणें तुरुंगांतून हलविण्यास अयोग्य करणारा असा कोणताही आजार त्यास झालेला नाहीं असा दाखला मेडिकल आफिसरानें दिल्याशिवाय, पाठवूं नये.

(३) कोणत्याही कैद्यास सोडून देणें तें, त्याला कोणताही आशुपरिणामी अगर भयंकर रोग झालेला असून तो सोडला जाण्यास खुषी नसेल तर, आणि त्याला सोडल्यानें त्याला स्वतःला अगर इतर मनुष्यांस धोका उत्पन्न होणार नाहीं असा अभिप्राय मेडिकल आफिसर देई तोंपर्यंत, सोडून देऊं नये.

---

## बाब ५.

### कैद्यांच्या शिस्तीबाबद.

*कैद्यांस निराळें ठेवण्याबाबद.*

२६. कैद्यांस निरनिराळे ठेवण्याबाबदचे ह्या आक्टाचे ठराव खालीं सांगितल्याप्रमाणें आहेत :—

(१) ज्या तुरुंगांत पुरुष जातीचे कैदी असून स्त्री जातीचे ही कैदी असतील, त्या तुरुंगांत, स्त्री जातीच्या कैद्यांस त्यांना पुरुष जातीच्या कैद्यांकडे पाहातां येऊं नये, त्यांबरोबर बोलतां येऊं नये अगर कोणत्याही प्रकारचा व्यवहार ठेवतां येऊं नये अशा रीतीनें निराळ्या इमारतींत अगर त्याच इमारतीच्या निरनिराळ्या भागांत, कैदेंत ठेविलें पाहिजे;

(२) ज्या तुरुंगांत अठरा वर्षांच्या आंतील कैदी कैदेंत ठेविलेले असतील त्या तुरुंगांत, त्या कैद्यांस इतर कैद्यांपासून निराळें ठेवण्याची आणि त्यांपैकीं जे कैदी उमेदींत आलेले असतील त्यांस जे उमेदींत आलेले नसतील त्यांपासून निराळे ठेवण्याची व्यवस्था केली पाहिजे ;

(३) ज्यांवर शाबितीचा ठराव झालेला नाहीं अशा कैद्यांस, ज्यांवर शाबितीचा ठराव झालेला आहे अशा कैद्यांपासून निराळें ठेविलें पाहिजे; आणि

(४) दिवाणी कैद्यांस फौजदारी कैद्यांपासून निराळें ठेविलें पाहिजे.

२७. स्थानिक सरकारास— कैद्यांस निरनिराळें ठेवण्याबद्दल कानू.

(१) ह्या आक्टांतील ठरावांअन्वयें कैद्यांस अंशतः अगर पूर्णपणें एकांतवासांत ठेवण्यासाठीं उपयोग करावयाच्या कोठड्यांच्या प्रकारासंबंधानें आणि त्यांच्या बांधणीसंबंधानें,

(२) तुरुंगाच्या कानूंविरुद्ध ज्यांनीं अपराध केलेला नाहीं त्या कैद्यांस निराळें कैदेंत ठेवावयाच्या वेळेच्या संबंधानें;

कानू करण्याचा अधिकार आहे.

२८. कोणत्याही कोठडींत, तींत ठेविलेल्या कैद्यास ज्याच्या योगानें तुरुंगाच्या कोणत्याही अमलदाराशीं संबंध ठेवितां येईल अशा साधनाची तजवीज करून ठेविलेली असल्याशिवाय, तिचा, कैद्यास एकांत कैदेंत ठेवण्याच्या कामीं उपयोग करूं नये ; आणि ज्या कोणत्याही कैद्यास शिक्षेदाखल ह्मणून अगर इतर कारणानें चोवीस तासांपेक्षां कमी नाहीं इतक्या मुदतीपर्यंत कोठडींत कोंडून ठेविलेलें असेल, त्या प्रत्येक कैद्याला मेडिकल आफिसरानें अगर त्याच्या हाताखालील एकाद्या वैद्यकीय नोकरानें दिवसांतून निदान एकवेळ तरी जाऊन पाहिलें पाहिजे. एकांत कैद.

२९. (१) फांशीची शिक्षा झालेला कैदी शिक्षा सांगण्यांत आल्यानंतर तुरुंगांत येतांच, त्याचा, जेलरनें अगर त्याच्या हुकुमाअन्वयें झाडा घेतला पाहिजे, जे जिन्नस त्या कैद्याजवळ राहूं देणें भयकारक अगर अयोग्य आहे असें जेलर यास वाटेल, ते त्याजवळून घेतले पाहिजेत. फांशीची शिक्षा झालेले कैदी.

(२) अशा प्रत्येक कैद्यास इतर सर्व कैद्यांपासून निराळें एक कोठडींत कोंडून ठेविलें पाहिजे आणि त्यावर दिवसास व रात्रीस पाहारा ठेवला पाहिजे.

---

## बाब ६.

### दिवाणी कैदी आणि शाबितीचा ठराव न झालेले फौजदारी कैदी ह्यांचें अन्न, कपडे, आणि बिछाने ह्यांबाबद.

३०. कोणत्याही दिवाणी कैद्याला अगर शाबितीचा ठराव न झालेल्या कोणत्याही फौजदारी कैद्याला आपला खर्च चालवूं दिला पाहिजे; आणि अन्न, कपडे, बिछाना अगर इतर जरूरीच्या वस्तु योग्य वेळीं विकत घेऊं दिल्या पाहिजेत अगर खासगी मनुष्याकडून आणण्याची मोकळीक दिली पाहिजे; मात्र सदर्हू प्रमाणें जे जिन्नस विकत घेण्यांत येतील अगर आणण्यांत येतील ते तपासणीस आणि इन्स्पेक्टर जनरल पसंत करितील त्या कानूंस पात्र राहातील. विवक्षित कैद्यांना स्वतःचा खर्च चालविण्याचा आणि आपल्या जेवणाचा तजवीज करण्याचा अखत्यार आहे.

३१. कोणत्याही दिवाणी कैद्याच्या अगर शाबितीचा ठराव न झालेल्या फौजदारी कैद्याच्या, अन्नाचा, कपड्यांची, बिछान्या अगर इतर जरूरीच्या जिन्नसांचा कोणताही भाग कोणत्याही दुसऱ्या कैद्यास देऊं नये अगर विकूं नये; हा नियम ज्या कोणत्याही कैद्याकडून मोडला जाईल त्याचा अन्न विकत घेण्याचा अगर तें खासगी मनुष्यांकडून आणण्याचा हक्क, सुपरिंटेंडटास योग्य वाटेल तितके दिवसपर्यंत रद्द होईल. विवक्षित कैद्यांनीं परस्परांस अन्न, कपडे वगैरे देण्याची बंदी.

दिवाणी कैद्यांस आणि शाबितीचा ठराव न झालेल्या फौजदारी कैद्यांस कपडे आणि बिछाने पुरविण्याबद्दल.

३२. (१) आपल्या स्वतःकरितां पुरेसे कपडे आणि बिच्छाना आणण्यास जो कोणताही दिवाणी कैदी आणि शाबितीचा ठराव न झालेला फौजदारी कैदी समर्थ नसेल, त्याला सुपरिंटेंडंटानें जरूर लागतील ते कपडे व बिच्छाना पुरविला पाहिजे.

(२) जेव्हां कोणत्याही दिवाणी कैद्याला कोणत्याही खासगी मनुष्याच्या तर्फे झालेल्या एकाद्या हुकुमनाम्याच्या बजावणींत तुरुंगांत घातलेलें असेल, तेव्हां, तो मनुष्य अगर त्याचा वारसा, त्या कैद्यास सदहूप्रमाणें पुरविलेल्या कपड्यांचा व बिच्छान्यांचा खर्च, सुपरिंटेंडंटास, मागितल्याबरोबर, देण्यास पात्र होईल; आणि सदहूप्रमाणें मागितलेला खर्च दिला नाहीं तर त्या कैद्यास सोडून दिलें पाहिजे.

---

## बाब ७.

### कैद्यांस कामावर लावण्याबद्दल.

दिवाणी कैद्यांचीं कामें.

३३. (१) दिवाणी कैद्यांस, सुपरिंटेंडंटाच्या परवानगीनें, कोणतेंही काम करण्याचा आणि कोणताही व्यवसाय किंवा धंदा करण्याचा अखत्यार आहे.

(२) स्वतःच्या हत्यारांनीं काम करणाऱ्या आणि ज्यांचा निर्वाह तुरुंगाच्या खर्चांवर होत नाहीं अशा दिवाणी कैद्यांचा सगळा मेहनताना त्यांस घेऊं दिला पाहिजे; परंतु, ज्या दिवाणी कैद्यांस तुरुंगाच्या खर्चानें हत्यारें पुरविलीं जातील, अगर ज्यांचा निर्वाह तुरुंगाच्या खर्चानें चाललेला असेल, त्यांचा मेहनताना, त्या हत्यारांच्या वापराबद्दल आणि निर्वाहाच्या खर्चाबद्दल सुपरिंटेंडंट ठरवील तितका कापून घेतला जाईल.

फौजदारी कैद्यांस कामावर लावणें.

३४. (१) मजुरीची शिक्षा झालेल्या कोणत्याही फौजदारी कैद्यास अगर स्वतःच्या इच्छेवरून मजुरीच्या कामावर लाविलेल्या कोणत्याही फौजदारी कैद्यास, निकडीचा प्रसंग शिवायकरून इतर कोणत्याही प्रसंगीं, कोणत्याही एका दिवसांत नऊ तासांपेक्षां जास्त वेळ कामावर लावूं नये; सदहू प्रकारच्या निकडीच्या प्रसंगीं त्यांस जास्तवेळ कामावर लावण्याबद्दल सुपरिंटेंडंटाची लेखी मंजुरी घेतली पाहिजे.

(२) मजुरीचें काम करणारे कैदी काम करीत असतांना मेडिकल आफिसरानें त्यांस वेळोवेळीं तपासलें पाहिजे, आणि दर पंधरवड्यांतून निदान एकदां, मजुरीच्या कामावर लाविलेल्या दरेक कैद्याच्या हकीकतीच्या तिकिटावर, त्या वेळचें त्या कैद्याचें वजन नोंदवलें पाहिजे.

(३) कोणताही कैदी कोणत्याही वर्गाचें अगर जातीचें मजुरीचें काम पुढें तसाच करीत राहिला तर त्याच्या प्रकृतीस अपाय होण्याचा संभव आहे असा मेडिकल आफिसराचा अभिप्राय असल्यास, त्या कैद्याला त्या कामावर न ठेवतां, मेडिकल आफिसराच्या मतें ज्या इतर वर्गाचें अगर जातीचें मजुरीचें काम त्याला योग्य असेल, त्या कामावर त्यास लाविलें पाहिजे.

साध्या कैदेची शिक्षा झालेल्या फौजदारी कैद्यांस कामावर लावणें.

३५. (१) साध्या कैदेची शिक्षा झालेल्या सर्व फौजदारी कैद्यांस, त्यांची इच्छा असेल तेथपर्यंत कामावर लावण्यासाठीं सुपरिंटेंडंटानें तजवीज केली पाहिजे.

(२) सदहूप्रमाणें करावयाचें काम किती व कोणत्या प्रकारचें असावें ह्याबद्दल सुपरिंटेंडंटानें नियम केले पाहिजेत; परंतु सक्तमजुरीची शिक्षा झालेली नाहीं अशा कोणत्याही कैद्यास, त्यानें काम करण्यांत हयगय केल्याबद्दल, अशा कैद्यांनीं कामांत हयगय केल्याच्या बाबतींत त्यांच्या अन्नाच्या प्रमाणांत जो फेरफार करण्याबद्दल तुरुंगाच्या नियमांत ठराव असेल, तसा फेरफार करण्याशिवाय इतर कोणत्याही रीतीनें शिक्षा करूं नये.

---

## बाब ८.

### कैद्यांच्या आरोग्याबद्दल.

३६. (१) ज्या कैद्यांची मेडिकल आफिसरास भेटण्याची इच्छा असेल, अगर ज्या कैद्यांची मानसिक अगर शारीरिक स्थिति बरोबर नाहीं असें दिसत असेल, त्यांचीं नांवें, त्यांचा प्रत्यक्ष ताबा असलेल्या अमलदारानें जेलर यास कळविलीं पाहिजेत. आजारी झालेले कैदी.

(२) जेलर ह्यानें, ज्या कोणत्याही कैद्याची मेडिकल आफिसरास भेटण्याची इच्छा असेल, अगर जो कोणताही कैदी आजारी असेल, अगर ज्याच्या मानसिक अगर शारीरिक स्थितीकडे लक्ष्य देण्याची जरूरी आहे असें दिसत असेल, त्या कैद्याकडे लक्ष्य देण्याविषयीं मेडिकल आफिसरास तावडतोब कळविलें पाहिजे,

आणि, अशा कोणत्याही कैद्याच्या व्यवस्थेबद्दल अगर त्यास वागविण्याच्या रीतीबद्दल मेडिकल आफिसर जे कोणतेही कायदेशीर हुकुम लिहून ठेवील, ते जेलर ह्यानें अमलांत आणिले पाहिजेत.

३७. औषधांचा पुरवठा करण्याबद्दलचे मेडिकल आफिसराचे हुकुम अगर ज्या कांहीं गोष्टी मेडिकल आफिसरानेंच स्वतः अगर आपल्या देखरेखीखालीं अमलांत आणिलेल्या असतील त्या गोष्टींसंबंधाचे हुकुम शिवाय करून कोणत्याही कैद्याच्या संबंधानें मेडिकल आफिसरानें केलेले इतर सर्व हुकुम, दररोज, त्या कैद्याच्या हकीकतीच्या तिकिटांत, अगर स्थानिक सरकार कानू करून ठरवील त्या इतर कोणत्याही बुकांत नोंदले पाहिजेत; आणि जेलरनें, सदई प्रकारच्या दरेक हुकुमासंबंधानें, तो हुकुम अमलांत आणिला किंवा नाहीं ह्याबद्दल योग्य जागीं दाखला लिहून शिवाय, आपणास त्याबद्दल जें कांहीं लिहावेंसें वाटेल तें लिहिलें पाहिजे आणि नोंदीची तारीख दाखल केली पाहिजे. मेडिकल आफिसरानें केलेल्या हुकुमांची नोंद.

३८. दरेक तुरुंगांत, एक बीमारखाना ह्मणजे आजारी असलेल्या कैद्यास ठेवण्यासाठीं एक जागा असली पाहिजे. बीमारखाना

---

## बाब ९.

### कैद्यांस भेटण्याबाबद आणि कैद्याच्या पत्रव्यवहाराबाबद.

३९. (१) ज्या कोणत्याही मनुष्यांजवळ दिवाणी कैद्यांस अगर शाबितीचा ठराव न झालेल्या फौजदारी कैद्यांस बोलावयाची इच्छा असेल, त्या मनुष्यांस तुरुंगांत योग्य वेळीं व योग्य निर्बंधांनिशीं येऊं देण्याबद्दल दरेक तुरुंगांत योग्य व्यवस्था केलेली असली पाहिजे. दिवाणी कैदी आणि शाबितीचा ठराव न झालेले फौजदारी कैदी ह्यांस भेटण्याबाबद.

(२) स्थानिक सरकारानें, चांगला बंदोवस्त व चांगली व्यवस्था राहाण्यास जरूर वाटेल त्या रीतीनें, कैद्यांनीं आपल्या इष्टमित्रांबरोबर कोणत्या रीतीनें बोलावें व पत्रव्यवहार करावा ह्यांचें नियमन केलें पाहिजे.

४०. (१) कोणत्याही कैद्यास भेटण्यासाठीं आलेल्या कोणत्याही मनुष्याचें नांव व पत्ता मागण्याचा जेलरास अख्त्यार आहे, आणि त्यास संशय येण्यास कांहीं कारण असेल तेव्हां, त्या भेटण्यास आलेल्या मनुष्याचा झाडा स्वतः अगर इतराकडून घेण्याचा अख्त्यार आहे; मात्र असा झाडा घेणें तो, कोणत्याही कैद्यासमक्ष किंवा भेटण्यासाठीं आलेल्या इतर कोणा मनुष्यासमक्ष घेतां कामा नये. भेटण्यास येणाऱ्या लोकांचा झाडा घेण्याचा जेलरास अख्त्यार आहे.

(२) सदई प्रकारचा कोणताही भेटण्यांस आलेला मनुष्य आपला झाडा घेऊं देण्यास नाकारील, तर, त्यास तुरुंगामध्यें न जाऊं देण्याचा जेलरास अख्त्यार आहे; आणि असें करण्याचीं कारणें, तपशिलासहित, त्यानें आपल्या रोजनिशींत दाखल केलीं पाहिजेत.

---

## बाब १०.

### तुरुंगांसंबंधाच्या अपराधांबाबद.

तुरुंगांत मनाईचे जिन्नस आणण्याबद्दल, आणि कैद्यांशीं संबंध ठेवण्याबद्दल शिक्षा.

४१. जो कोणताही मनुष्य, कलम ५९ अन्वयें केलेल्या कानूंविरुद्ध, त्या कानूंत सांगितलेला कोणताही जिन्नस, कोणत्याही तुरुंगांत अगर कलम ५ अन्वयें कैद्यांस कांहीं कालपर्यंत राहाण्यासाठीं आणि बंदोबस्तानें अटकेंत ठेवण्यासाठीं नेमिलेल्या जागेंत आणील, फेंकील, अगर कोणत्याही रीतीनें प्रविष्ट करण्याचा प्रयत्न करील, अगर तशी कोणतीही वस्तु कोणत्याही कैद्याला, तो तुरुंगाच्या हद्दीबाहेर असतांना देईल अगर देण्याचा प्रयत्न करील, त्या प्रत्येक मनुष्यास,

आणि जो कोणताही तुरुंगाचा अमलदार, सदरी उल्लेख केलेल्या कानूंविरुद्ध, सदर्हू प्रकारचा कोणताही जिन्नस सदर्हू प्रकारच्या कोणत्याही तुरुंगांत अगर जागेंत जाणून बुजून आणूं देईल, अगर कोणत्याही कैद्याच्या कबजांत जाणून बुजून राहूं देईल अगर तुरुंगाच्या हद्दींबाहेर कोणत्याही कैद्यास देऊं देईल त्या प्रत्येक अमलदारास,

आणि जो कोणताही मनुष्य, सदर्हू प्रकारच्या कोणत्याही कानूंविरुद्ध, कोणत्याही कैद्याशीं संबंध ठेवील अगर संबंध ठेवण्याचा प्रयत्न करील, त्या प्रत्येक मनुष्यास,

आणि जो कोणताही मनुष्य, ह्या कलमांत ज्या अपराधास शिक्षा सांगितली आहे तो अपराध करण्यांत मदत करील, त्या प्रत्येक मनुष्यास,

त्यावर कोणत्याही माजिस्त्रेटापुढें शाबितीचा ठराव झाला ह्मणजे, पराकाष्ठा साहा महिनेपर्यंत कैदेची, अगर दोनशें रुपयेपर्यंत दंडाची शिक्षा होईल अगर ह्या दोन्ही शिक्षा होतील.

कलम ४१ खालील अपराधाबद्दल धरण्याचा अधिकार.

४२. जेव्हां कोणताही मनुष्य तुरुंगाच्या कोणत्याही अमलदारासमक्ष सदरील शेवटल्या कलमांत सांगितलेला कोणताही अपराध करील, आणि त्या अमलदारानें त्याच नांव व पत्ता मागितला असतां तो देण्यास नाकारील, अगर त्या अमलदारास खोटें ह्मणून माहीत असलेलें अगर जें खोटें आहे असें वाटण्यास त्यास कारण आहे असें नांव व पत्ता देईल, तेव्हां, त्या अमलदारास त्या मनुष्याला धरण्याचा अख़्त्यार आहे, आणि येणेंप्रमाणें धरल्यानंतर त्यानें त्यास, गैरवाजवी विलंब न लावितां, एकाद्या पोलीस अमलदाराच्या स्वाधीन केलें पाहिजे, मग त्या पोलीस अमलदारानें, तो अपराध आपल्यासमक्ष करण्यांत आला होता असें समजून काम चालविलें पाहिजे.

शिक्षा जाहीर केल्या पाहिजेत.

४३. सुपरिंटेंडंटानें, कलम ४१ खालील कोणताही अपराध करणारे लोक कोण कोणत्या शिक्षांस पात्र होतात त्या शिक्षा नमूद केलेली अशी एक नोटीस इंग्रजी भाषेंत आणि त्या जागच्या देशी भाषेंत, तुरुंगाच्या अगर सदरीं सांगितल्याप्रमाणें कैद्यांसाठीं नेमिलेल्या जागेच्या बाहेरच्या बाजूस सर्वांस सहज दिसेल अशा जागीं, लावविली पाहिजे.

---

## बाब ११.

### तुरुंगांतील अपराधांबाबद.

तुरुंगांतील अपराध.

४४. कोणताही कैदी खालीं दाखल केलेले अपराध करील तेव्हां त्यास तुरुंगांतील अपराध समजावें :—

(१) कोणत्याहीं कैद्यानें तुरुंगाच्या नियमांचा मुद्दाम केलेला जो कोणताही भंग, कलम ५८ अन्वयें केलेल्या कानूंमध्यें तुरुंगांतील अपराध ह्मणून ठरविला असेल, तो भंग;

(२) कोणत्याही कैद्यानें आंगावर जाणें अगर अन्यायाची बळजोरी करणें;

(३) कोणत्याही कैद्यानें अपमानास्पद अगर धमकीचे शब्द बोलणें;

(४) कोणत्याही कैद्याची अनीतीची, बीभत्स अगर अव्यवस्थित अशी वर्तणूक;

(५) कोणत्याही कैद्यानें, आपणास मजूरी करतां न यावी ह्मणून आपणास मुद्दाम असमर्थ करून घेणें;

(६) मगरूरीनें काम करण्यास नाकारणें;

(७) हातविड्या, पायविड्या अगर गज कानसणें, कापणें, त्यांत फेरफार करणें अगर त्या किंवा ते काढणें;

(८) सक्त मजुरीच्या कैदेची शिक्षा झालेल्या कोणत्याही कैद्यानें काम करितांना मुद्दाम आळस अगर हलगर्जीपणा करणें;

(९) सक्त मजुरीच्या कैदेची शिक्षा झालेल्या कोणत्याही कैद्यानें कामाची मुद्दाम अव्यवस्था करणें;

(१०) तुरुंगाच्या मिळकतीचें मुद्दाम नुकसान करणें;

(११) हकीकतीचीं तिकिटें, दफ्तर किंवा दस्तऐवज ह्यांत घालमेल करणें, अगर फेरफार करणें अगर त्यांतला मजकूर विरूप करणें;

(१२) ह्या आक्टाच्या ५९ व्या कलमाअन्वयें केलेल्या कानूविरुद्ध कोणतेही जिन्नस घेणें, कबजांत ठेवणें अगर दुसऱ्यास देणें;

(१३) आजारी असल्याचें ढोंग करणें अगर आजार लपवणें;

(१४) कोणत्याही अमलदारावर अगर कैद्यावर जाणून बुजून खोटा आरोप आणणें;

(१५) कोणतीही आग, कोणताही कट अथवा बेत, कोणत्याही कैद्याचें पळून जाणें अगर कोणत्याही कैद्याचा पळून जाण्याचा प्रयत्न अथवा तयारी, आणि कोणत्याही कैद्यावर अगर तुरुंगाच्या अमलदारावर केलेला हल्ला अगर हल्ला करण्याची तयारी आपल्यास माहीत झाल्याबरोबर त्याबद्दल रिपोर्ट न करणें अगर रिपोर्ट करण्यास नाकारणें;

(१६) पळून जाण्याचा कट करणें, अगर पळून जाण्यांत अगर सदहू प्रकारचा दुसरा कोणताही अपराध करण्यास साह्य करणें.

४५. सुपरिंटेंडंटास, सदहू प्रकारच्या कोणत्याही अपराधाबद्दल कोणत्याही मनुष्यास तपासून, त्या अपराधासंबंधानें निकाल करण्याचा व त्याबद्दल खालील शिक्षा करण्याचा अख्त्यार आहे: त्या शिक्षा येणेंप्रमाणें:— सदहू अपराधाबद्दल शिक्षा.

(१) यथापद्धति ताकीद देणें;

**खुलासा.**—यथापद्धति ताकीद ह्मणजे, सुपरिंटेंडंटानें कैद्यास स्वतः दिलेली, आणि शिक्षेच्या बुकांत आणि कैद्याच्या हकीकतीचा तिकिटांत लिहून ठेविलेली ताकीद, असें समजावें;

(२) कामांत बदल करून, ज्यास्त कंटाळवाणें अगर जास्त कठिण असें काम सांगणें.

(३) सक्त मजुरीची शिक्षा न झालेल्या कैद्यांच्या बाबतींत, सात दिवसांपेक्षां जास्त नाहीं इतक्या मुदतीची सक्त मजुरी करावयास लावणें;

(४) त्या कालीं अमलांत असलेल्या माफीच्या पद्धतीअन्वयें ज्या सवलती कैद्यास मिळण्यासारख्या असतील, त्या सवलती, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे कानू करून ठरवितील त्याप्रमाणें बुडविणें ;

(५) शासनिक अन्नावर ठेवणें: ह्मणजे, स्थानिक सरकार सांगेल त्या रीतीनें आणि तें सरकार मजुरीसंबंधाच्या अटी ठरवितील त्यांस पात्र राहून, कैद्याचें अन्न कमी करणें ;

मात्र इतकेंच कीं, सदरीं सांगितल्याप्रमाणें कोणत्याही कैद्यास शासनिक अन्नावर ठेवणें तें कोणत्याही प्रसंगीं एकसारखें शाण्णव तासांहून जास्त मुदतीपर्यंत ठेवूं नये, आणि ही शासनिक अन्नाची शिक्षा, अपराध पुनः करण्यांत आल्याखेरीज पुनः करूं नये, आणि ती पुनः करणें ती देखील, [पहिली शिक्षा होऊन] एक अठवडा उलटून जाई तोंपर्यंत करूं नये;

(६) सात दिवसांपेक्षां जास्त नाहीं अशा कोणत्याही मुदतीपर्यंत एकांत कैदेंत ठेवणें :

मात्र इतकेंच कीं, कोणत्याही कैद्याला एकांत कैदेंत ठेविल्यानंतर त्याला जर पुनः एकांत कैदेंत ठेवावयाचें असलें, अगर अलग कैदेंत ठेवावयाचें असलें तर, त्या पहिल्या कैदेनंतर त्या कैदेच्या मुदती इतका काल उलटून गेल्याशिवाय त्यास पुनः एकांत कैदेंत ठेवूं नये, अगर अलग कैदेंत ठेवूं नये :

खुलासा.—एकांत कैद ह्या संज्ञेचा अर्थ, ज्या कैदेंत कैदी असतांना त्यास इतर कैदी मुळींच दृष्टीस पडत नाहींत व त्यांशीं मुळींच संबंधही ठेवितां येत नाहीं, अशी, सक्त मजुरीशिवाय अगर सक्त मजुरीनिशीं कैद, असा समजावा ;

(७) चवदा दिवसांपेक्षां जास्त नाहीं अशा कोणत्याही मुदतीपर्यंत अलग कैदेंत ठेवणें :

मात्र इतकेंच कीं, कोणत्याही कैद्याला अलग कैदेंत ठेविल्यानंतर त्याला जर पुनः अलग कैदेंत ठेवावयाचें असलें, अगर एकांत कैदेंत ठेवावयाचें असलें, तर, त्या पहिल्या कैदेनंतर त्या कैदेच्या मुदतीइतका काल उलटून गेल्याशिवाय त्यास पुनः अलग कैदेंत ठेवूं नये अगर एकांत कैदेंत ठेवूं नये.

खुलासा.—अलग कैद ह्या संज्ञेचा अर्थ, ज्या कैदेंत कैदी असतांना त्यास इतर कैदी दृष्टीस पडतात परंतु त्यांशीं संबंध मुळींच ठेवितां येत नाहीं, अशी, सक्त मजुरीशिवाय अगर सक्त मजुरीनिशीं कैद, असा समजावा;

(८) साहा महिन्यांपेक्षां जास्त नाहीं अशा मुदतीपर्यंत कोठडीची कैद देणें :

खुलासा.—कोठडीची कैद ह्या संज्ञेचा अर्थ, ज्या कैदेंत कैदी असतांना त्यास इतर कैदी दृष्टीस पडतात परंतु त्यांशीं संबंध मुळींच ठेवितां येत नाहीं आणि ज्या कैदेंत कैद्याला दर दिवसास एका तासापेक्षां कमी नाहीं इतका वेळपर्यंत व्यायाम करण्याची मोकळीक असते, अशी सक्त मजुरीनिशीं अगर सक्त मजुरीशिवाय कैद असा समजावा;

(९) रकम (५) हींत सांगितलेली शासनिक अन्नाची शिक्षा देऊन, शिवाय, रकम (६) हींत सांगितलेली एकांत कैदेची शिक्षा देणें;

(१०) हातविड्या घालणें; ह्या हातविड्या गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांनीं केलेल्या कानूंत ठरविण्यांत येईल त्या तऱ्हेच्या असन, त्या, घालण्याच्या रीतीच्या संबंधानें व घालण्याच्या मुदतीच्या संबंधानें त्या कानूंत जे नियम सांगण्यांत येतील त्यांस पात्र राहातील;

(११) पायविड्या घालणें; ह्या पायविड्या, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांनीं केलेल्या कानूंत ठरविण्यांत येईल त्या तऱ्हेच्या, व तितक्या वजनाच्या असून, त्यांत सांगण्यांत येईल त्या रीतीनें व तितक्या मुदतीपर्यंत घातल्या पाहिजेत;

(१२) तीन महिन्यांपेक्षां जास्त नाहीं इतक्या मुदतीपर्यंत, इतर जातीचे कपडे काढून ठेवून त्यांच्या ऐवजीं गोणपाटाचे कपडे घालायास देणें.

(१३) फटके देणें; मात्र, ते फटके तीसपेक्षां जास्त मारूं नयेत:

मात्र इतकेंच कीं, कोणताही स्त्री जातीचा कैदी अगर दिवाणी कैदी कोणत्याही प्रकारच्या हातविड्या अगर पायविड्या घातल्या जाण्यास अगर फटके दिले जाण्यास पात्र होतो, असा ह्या कलमांतील कोणत्याही ठरावाचा अर्थ समजूं नये.

४६. सदर्हू प्रकारच्या कोणत्याही अपराधाबद्दल, कलम ४९ ह्यांत सांगितलेल्या कोणत्याही दोन शिक्षा जोडून देण्याचा अखत्यार आहे: मात्र, हा ठराव खालील अपवादांस पात्र राहील:— कलम ४६ अन्वयें एकापेक्षां जास्त शिक्षा देणें.

(१) यथापद्धीत द्यावयाच्या ताकिदीला दुसरी कोणतीही शिक्षा जोडूं नये;

(२) शासनिक अन्नाच्या शिक्षेला "कामांत बदल करण्याची" शिक्षा जोडूं नये; त्याचप्रमाणें, केवळ शासनिक अन्नाच्या आणखी शिक्षेला, शासनिक अन्नाच्या ज्या शिक्षेला एकांत कैदेची शिक्षा जोडिलेली असेल, ती शिक्षा जोडूं नये.

(३) एकांत कैदेच्या शिक्षेस अलग कैदेची शिक्षा अगर कोठडीच्या कैदेची शिक्षा जोडून अगर अलग कैदेच्या शिक्षेस कोठडीची शिक्षा जोडून, कैदी एकांतवासाच्या ज्या मुदतीस पात्र झाला असेल, ती मुदत वाढवूं नये;

(४) फटक्यांचा शिक्षेस, अलग कैदेची शिक्षा आणि माफीच्या पद्धतीखालीं मिळालेल्या सवलती बुडण्याची शिक्षा ह्यांखेरीज दुसरी कोणतीही शिक्षा जोडूं नये.

४७. (१) ह्या आक्टाच्या ४९ व्या व ४६ व्या कलमांमध्यें सांगितलेल्या कोणत्याही शिक्षा देण्याचा सुपरिंटेंडंट ह्यास अधिकार आहे; मात्र, कोठडीच्या कैदेची शिक्षा एक महिन्याहून जास्त मुदतीपर्यंत द्यावयाची असेल तेव्हां, तिच्याबद्दल इन्स्पेक्टर जनरलची आधीं मंजुरी आणविली पाहिजे. कलमें ४५ व ४६ ह्यांअन्वयें एकापेक्षां जास्त शिक्षा देणें.

(२) सुपरिंटेंडंटाच्या हाताखालील कोणत्याही अमलदारास कोणतीही शिक्षा देण्याचा अधिकार नाहीं:

४८. (१) सदर्हू कलमांत सांगितलेल्या शिक्षांबाहेरची कोणतीही शिक्षा कोणत्याही कैद्यास करतां कामास नये; आणि कोणत्याही कैद्यास कोणतीही शिक्षा करणें ती, सदरील कलमांत सांगितलेल्या रीतीशिवाय इतर कोणत्याही रीतीनें करतां कामा नये. शिक्षा, सदर्हू कलमांबरहुकुम झाल्या पाहिजेत.

(२) जो कोणताही जेलर अगर कोणत्याही तुरुंगाचा हाताखालील अमलदार ह्या कलमांतील ठरावाचा भंग करील, त्यानें, ह्या आक्टाच्या ९३ व्या कलमाअन्वयें शिक्षा करण्यास योग्य असा अपराध केला आहे असें समजलें पाहिजे.

कैद्यास शिक्षा करण्यास त्याच्या प्रकृतीसंबंधानें कांहीं हरकत नाहीं असा मेडिकल आफिसरानें दाखला दिला पाहिजे.

४९. (१) कोणतीही शासनिक अन्नावर ठेवण्याची शिक्षा अगर शासनिक अन्नावर ठेवण्याच्या शिक्षेस जोडून दिलेली दुसरी कोणतीही शिक्षा अगर फटके देण्याची शिक्षा, ती ज्या कैद्यास दिलेली असेल त्या कैद्यास मेडिकल आफिसर तपासी तोंपर्यंत, अमलांत आणूं नये; त्या कैद्यास दिलेली शिक्षा तो भोगण्यास प्रकृतिमानानें समर्थ आहे असें मेडिकल आफिसरास वाटल्यास, त्यानें, त्याप्रमाणें, कलम १७ ह्यांत सांगितलेल्या शिक्षेच्या बुकाच्या योग्य कोष्टकांत दाखला लिहिला पाहिजे.

(२) त्या कैद्यास दिलेली शिक्षा तो भोगण्यास असमर्थ आहे असें त्या मेडिकल आफिसरास वाटेल तर त्यानें सदरीं सांगितल्याप्रमाणें आपलें मत लिहून ठेविलें पाहिजे, आणि तो कैदी त्या प्रकारची शिक्षा भोगण्यास अगदींच असमर्थ असल्यास तसें किंवा त्या शिक्षेंत कांहीं बदल करणें जरूर आहे असें त्या मेडिकल आफिसराचें मत असल्यास तसें, त्यानें लिहून ठेविलें पाहिजे.

(३) शिक्षेंत कांहीं बदल करणें जरूर आहे असें त्या मेडिकल आफिसरास वाटत असल्यास, त्यानें, त्या कैद्यास, त्याच्या प्रकृतीस इजा न होतां किती शिक्षा आपल्या मतें भोगतां येईल, तें लिहून ठेविलें पाहिजे.

शिक्षेच्या बुकांतील नोंदी.

५०. (१) ह्या आक्टाच्या १७व्या कलमांत सांगितलेल्या शिक्षेच्या बुकांत, अमलांत आणिलेल्या दरेक शिक्षेच्या संबंधानें खालील नोंदी दाखल केल्या पाहिजेत: त्या नोंदी येणेंप्रमाणें:—कैद्याचें नांव, त्याचा रजिस्टर नंबर आणि तो कोणत्या वर्गाचा कैदी आहे (ह्मणजे, अपराध करण्याची संवय झालेल्यांपैकीं आहे किंवा तशांपैकीं नाहीं) तें, त्यानें कोणता अपराध केला होता तें, तो अपराध ज्या तारिखेस केला ती तारीख, पूर्वींचे जे अपराध त्या कैद्याच्या नांवावर नोंदले गेले असतील त्यांची संख्या, शेवटल्या अपराधाची तारीख, दिलेली शिक्षा आणि ती शिक्षा अमलांत आणल्याची तारीख.

(२) प्रत्येक मोठ्या अपराधाच्या बाबतींत, तो अपराध शाबीत करणाऱ्या साक्षीदारांचीं नांवें लिहून ठेविलीं पाहिजेत, आणि फटक्यांची शिक्षा देण्यांत येईल त्या अपराधाच्या बाबतींत, सुपरिंटेंडटानें, साक्षीदारांच्या जबान्यांचा सारांश, कैद्याचें आपल्या तर्फे काय ह्मणणें असेल तें, आणि केलेला निकाल व तसा निकाल करण्याचीं कारणें, हें सर्व लिहून ठेविलें पाहिजे.

(३) दरेक शिक्षेसंबंधी नोंदीच्या समोर, जेलर व सुपरिंटेंडट ह्यांनीं त्या नोंदी बिनचुक असल्याबद्दलच्या दाखल्या दाखल आपल्या संक्षिप्त सह्या केल्या पाहिजेत.

मोठा अपराध करण्यांत आल्यानंतर काम कसें चालवायाचें तें.

५१. जर कोणत्याही कैद्यानें तुरुंगांतील शिस्तीच्या विरुद्ध कोणताही अपराध केला, आणि त्यानें असे अपराध वारंवार केलेले असल्यावरून अगर इतर कांहीं कारणावरून सुपरिंटेंडटास असें वाटलें कीं, आपल्यास ह्या आक्टाअन्वयें त्यास जी शिक्षा देण्याचा अधिकार आहे ती शिक्षा त्या अपराधाबद्दल पुरेशी होणार नाहीं, तर, सुपरिंटेंडटास, त्या कैद्याला जिल्हा माजिस्ट्रेटाच्या कोर्टांत अगर हुकुमत असणाऱ्या पहिल्या वर्गाच्या कोणत्याही माजिस्ट्रेटाच्या कोर्टांत त्यासंबंधाच्या लेखी हकीकतीसहित पाठविण्याचा अखत्यार आहे; आणि अशा माजिस्ट्रेटानें, त्यापुढें तो कैदी आणला ह्मणजे, सदर्हू प्रमाणें त्या कैद्यावर आणिलेल्या आरोपासंबंधानें चौकशी करून, त्याचा इन्साफ केला पाहिजे, आणि शाबितीचा ठराव करण्यांत आल्यानंतर त्या माजिस्ट्रेटास, त्या कैद्याला पराकाष्ठा एक वर्षपर्यंत साधी अगर सक्त मजुरीची शिक्षा देण्याचा अगर ह्या आक्टांतल्या ४९ व्या

व ४६ व्या कलमामध्यें शिक्षेचे जे प्रकार सांगितले आहेत त्यांपैकीं कोणत्याही प्रकारची शिक्षा देण्याचा अखत्यार आहे; मात्र, सदर्हूप्रमाणें दिलेली साधी अगर सक्त मजुरीच्या कैदेची शिक्षा तो अपराध त्या कैद्यानें केला तेव्हां तो जी कैदेची शिक्षा भोगीत असेल त्या कैदेच्या शिक्षेशिवाय आणखी समजावी, आणि एकाच अपराधाबद्दल कोणत्याही कैद्याला दोनदां शिक्षा होऊं नये.

९२. (१) कोणतीही फटक्यांची शिक्षा हल्याहल्यांनीं आणि सुपरिंटेंडंट व मेडिकल आफिसर अगर त्याच्या हाताखालील एकादा वैद्यकीय अमलदार हजर असल्याशिवाय, अमलांत आणूं नये. फटक्यांची शिक्षा.

(२) फटक्यांची शिक्षा, कुल्यांवर, अर्ध्या इंचापेक्षां कमी जाड नाहीं अशा वेताच्या बारीक छडीनें करावी, आणि सोळा वर्षांच्या आंतील वयाच्या कैद्यांच्या बाबतींत, ती शिक्षा, त्याच रीतीनें, अधिक बारीक अशा वेताच्या छडीनें करावी.

९३. (१) कोणत्याही तुरुंगाचा जो कोणताही जेलर अगर हाताखालील अमलदार कोणत्याही कैद्याला छळील, अगर ह्या आक्टाचे कोणतेही ठराव अगर कलम ५८ अगर कलम ५९ ह्यांअन्वयें केलेली कोणतीही कानू जाणून बुजून मोडील अगर उपेक्षील, तो, सुपरिंटेंडंट अगर इन्स्पेक्टर जनरल ह्याच्या हुकुमानें तीन महिन्यांच्या पगारापेक्षां जास्त नाहीं इतक्या दंडास पात्र होईल. तुरुंगाच्या अमलदारांस शिक्षा करणें.

(२) ह्या कलमाअन्वयें केलेला कोणताही दंड, त्या अमलदाराच्या पगारांतून कापून घेऊन अगर दंड वसूल करण्याच्या संबंधानें त्या वेळीं अमलांत असलेल्या कायद्या-अन्वयें, वसूल करण्याचा अखत्यार आहे.

९४. (१) कोणत्याही तुरुंगाचा जो कोणताही जेलर अगर हाताखालील अमलदार आपल्या कर्तव्याचा भंग करील अगर योग्य अधिकाऱ्यानें केलेली कोणतीही कानू, अगर नियम अगर कायदेशीर हुकुम मुद्दाम तोडील अगर उपेक्षील, अगर परवानगी-शिवाय किंवा हुद्याचें काम सोडून देण्याच्या आपल्या इराद्याची लेखी सूचना अगाऊ दोन महिने न देतां आपल्या हुद्याचें काम सोडून देईल, अगर आपल्या तुरुंगांतील कामाशिवाय इतर कोणतेंही काम परवानगीशिवाय करील, अगर भित्रेपणा करील, अगर आपल्या कबज्यांत असलेल्या कोणत्याही मनुष्यावर त्या वेळच्या स्थितीस जरूर नाहीं अशी जबरदस्ती करील, त्यावर कोणत्याही माजिस्ट्रेटापुढें शाबितीचा ठराव झाला ह्मणजे, तो दोनशें रुपयेपर्यंत दंडास अगर पराकाष्ठा तीन महिनेपर्यंत साध्या अगर सक्त मजुरीच्या कैदेस पात्र होईल, अगर त्या दोन्ही शिक्षांस पात्र होईल. तुरुंगाच्या अमलदारांनीं केलेले अपराध.

(२) ह्या कलमाअन्वयें अगर ९३ व्या कलमाअन्वयें कोणत्याही मनुष्यास एकाच अपराधाबद्दल दोनदां शिक्षा होणार नाहीं.

## बाब १२.

### किरकोळ.

९५. तुरुंगाची स्थिति अगर कैद्यांची वागणूक ह्यांच्या संबंधानें विचार करतां सुपरिंटेंडंटास जर असें वाटेल कीं, कोणत्याही कैद्यांच्या विशेष बंदोबस्तासाठीं त्यांस बिड्यांसह कैदेंत ठेवणें जरूर आहे, तर त्यास, इन्स्पेक्टर जनरल स्थानिक सरकारच्या मंजुरीनें ज्या कानू व समजुती घालून देतील, त्या कानूंस व समजुतींस अनुसरून तसें करण्याचा अखत्यार आहे. बिड्यांसह कैद.

९६. (१) काळेपाण्याची शिक्षा झालेल्या कैद्यांस, कलम ५९ अन्वयें केलेल्या कानूंस अनुसरून, त्यांना तुरुंगांत घेतल्यानंतरच्या पहिल्या तीन महिन्यांपर्यंत, पाय-बिड्यांसह कैदेंत ठेविलें पाहिजे. काळेपाण्याची शिक्षा झालेल्या कैद्यांस बिड्यांसह कैदेंत ठेवणें.

(२) सदहू प्रकारच्या कोणत्याही कैद्याच्या विशेष बंदोबस्तासाठीं अगर इतर कोणत्याही कारणासाठीं त्यावर तीन महिन्यांपेक्षां जास्त मुदतीपर्यंत पाय-बिड्या ठेवणें जरूर आहे असें सुपरिंटेंडंटास वाटल्यास, त्यानें, त्या बिड्या जितक्या मुदतीपर्यंत राहूं देणें त्याला अवश्य वाटत असेल तितक्या मुदतीपर्यंत त्या राहूं देण्याबद्दल मंजुरी मिळविण्यासाठीं इन्स्पेक्टर जनरल आफ़ प्रिझन्स ह्यांकडे लिहिलें पाहिजे; आणि त्याप्रमाणें पाय-बिड्या राहूं देण्याबद्दल मंजुरी देण्याचा इन्स्पेक्टर जनरल ह्यांस अख्त्यार आहे.

जरूरी शिवाय जेलरनें कैद्यांस बिड्या घालूं नयेत.

५७. तशीच निकडीची जरूरी असल्याशिवाय, जेलरनें, आपल्या अधिकारावर, कोणत्याही कैद्याला बिड्या घालूं नयेत, अगर शारीरिक निर्बंधांत ठेवूं नये; निकडीच्या प्रसंगीं त्यानें तसें केलें तर त्याबद्दल त्यानें सुपरिंटेंडंटास तावडतोब कळविलें पाहिजे.

कानू करण्यास अधिकार.

५८. गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस, ब्रिटिश हिंदुस्थानाच्या कोणत्याही भागाबद्दल आणि कोणत्याही स्थानिक सरकारास, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या अगाऊ मंजुरीनिशीं आपल्या ताब्यांतील मुलुखाबद्दल, खालीं सांगितलेल्या बाबतींच्या संबंधानें ह्या आक्टाशीं जुळत्या अशा कानू करण्याचा अधिकार आहे : ह्मणजे—

(१) ज्या कृत्यांस तुरुंगांतील अपराध ह्मणावयाचें तीं कृत्यें कोणतीं तें निर्दिष्ट करणाऱ्या कानू;

(२) अशा अपराधांचे मोठे अपराध व लहान अपराध असे वर्ग ठरविणाऱ्या कानू;

(३) असे अपराध अगर अशा वर्गाचे अपराध केल्याबद्दल ज्या शिक्षा ह्या आक्टाअन्वयें देतां येतील त्या शिक्षा ठरविणाऱ्या कानू;

(४) जीं कृत्यें तुरुंगांतील अपराध व इंडियन पीनल कोड खालीलही अपराध होत असतील त्यांची व्यवस्था तुरुंगांतील अपराधांप्रमाणें कोणत्या प्रसंगीं करावी व कोणत्या प्रसंगीं करूं नये ते प्रसंग ठरविणाऱ्या कानू;

(५) गुण देण्याबद्दल आणि शिक्षांची मुदत कमी करण्याबद्दल कानू;

(६) कैद्यांनीं दंगा केला तर अगर तुरुंगांतून पळून जाण्याचा प्रयत्न केला तर त्यांपैकीं कोणत्याही कैद्याविरुद्ध अगर कैद्यांच्या समूहाविरुद्ध हत्यारांचा उपयोग करण्याचा अधिकार देण्याबद्दल कानू;

(७) ह्या आक्टांतील अगर ह्या आक्टाअन्वयें केलेल्या कोणत्याही कानूंतील सर्व अगर कोणतेही ठराव सब्सिडियरी तुरुंगांस अगर सन १८८२ चें क्रिमिनल प्रोसीजर कोड ह्याच्या ५४१ व्या कलमाअन्वयें नेमिलेल्या कैदेंत ठेवण्याच्या विशेष जागांस, आणि ते तुरुंग अगर त्या जागा ताब्यांत असणाऱ्या अमलदारांस लागू करण्याच्या कानू.

कानू करण्यास स्थानिक सरकारास अधिकार.

५९. (१) स्थानिक सरकारास, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांच्या निर्बंधास पात्र राहून, खालील बाबतींच्या संबंधानें ह्या आक्टाशीं जुळत्या अशा कानू करण्याचा अख्त्यार आहे: ह्मणजे—

(१) तुरुंगांची व्यवस्था करण्याबद्दल आणि ह्या आक्टाअन्वयें नेमिलेल्या सर्व अमलदारांच्या समजुतीसाठीं, कानू;

(२) फौजदारी कैद्यांच्या आणि ज्या कैद्यांचा खर्च ते कैदी स्वतः चालवीत नसून इतर रीतीनें चालविण्यांत येतो अशा दिवाणी कैद्यांच्या अन्नाबद्दल, बिछान्याबद्दल, आणि कपड्यांबद्दल कानू;

(३) कैद्यांस तुरुंगांत अगर तुरुंगाबाहेर कामावर लावण्याच्या आणि त्यांवर निर्बंध ठेवण्याच्या संबंधाचे आणि अशा कैद्यांचा ताबा असणाऱ्या पाहारेकऱ्यांच्या समजुतीसाठीं, कानू;

(४) जे जिन्नस योग्य परवानगीशिवाय तुरुंगांत आणण्याची मनाई आहे ते जिन्नस निर्दिष्ट करणाऱ्या कानू;

(५) मजुरीच्या प्रकारांचे वर्ग लावण्याकरितां कानू;

(६) कैद्यांस कामावर लावल्यापासून होणाऱ्या उत्पन्नाची व्यवस्था कोणत्या रीतीनें लावावयाची त्याबद्दल कानू;

(७) काळेपाण्याची शिक्षा झालेल्या कैद्यांस बिड्यांसह कैदेंत ठेवण्याचें नियमन करण्याबाबद कानू;

(८) कैद्यांचे वर्ग लावून त्यांस निरनिराळे ठेवण्याबद्दल कानू;

(९) हकीकतीचीं तिकिटें तयार करून ती चालू ठेवण्याबाबद कानू;

(१०) कैद्यांत निवडून त्यांस तुरुंगाचे अमलदार नेमण्याबाबद कानू;

(११) चांगल्या वर्तणुकीबद्दल इनामें देण्याबद्दल कानू;

(१२) कैद्यांस एका तुरुंगांतून अगर जागेंतून दुसऱ्या तुरुंगांत अगर जागेंत पाठविण्याच्या कामाचें नियमन करण्याबाबद कानू;

(१३) तुरुंगांत ठेविलेल्या वेड लागलेल्या फौजदारी कैद्यांस अगर वेडांतून बरें झालेल्या फौजदारी कैद्यांस औषधपाणी करण्याबद्दल, त्यांचें स्थलांतर करण्याबद्दल आणि त्यांची व्यवस्था लावण्याबद्दल कानू;

(१४) कैद्यांचीं अपिलें व अर्ज पाठविण्याच्या कामाचें नियमन करण्याबद्दल कानू;

(१५) तुरुंगांच्या विजिटरांच्या नेमणुकीबद्दल आणि समजुतीसाठीं कानू; आणि

(१६) साधारणतः, कैद्यांस तुरुंगांत घेण्याच्या संबंधानें, त्यांस अटकेंत ठेवण्याच्या संबंधानें, त्यांस कामावर लावण्याच्या संबंधानें, त्यांस अन्न देण्याच्या संबंधानें त्यांस औषधपाणी करण्याच्या संबंधानें आणि सोडण्याच्या संबंधानें, आणि, ह्या आक्टास जुळत्या अशा दुसऱ्या कोणत्याही कारणांसंबंधानें कानू.

(२) सदर्हू कानूंपैकीं तुरुंगाच्या व्यवस्थेसंबंधाच्या कानूंच्या नकला, जेथें, तुरुंगांत कामावर ठेविलेल्या सर्व मनुष्यांस जाण्यायेण्याची मोकळीक असेल, तेथें त्यांस दिसतील अशा रीतीनें लावून ठेविल्या पाहिजेत.

चालू असलेल्या विवक्षित कानू कायदेशीर ठरविण्याबाबद.

६०. कलमें १२, २७, ३५, ५५, ५६, ५८ आणि ५९ ह्यांतील विषयांसंबंधाच्या ज्या कानू सांप्रत अमलांत असतील, त्या ह्या आक्टास अनुसरून असतील तेथवर, त्या त्या कलमाअन्वयें केलेल्या आहेत असें समजावें, आणि तुरुंगाचे सांप्रतचे अमलदार त्या आक्टाअन्वयें नेमण्यांत आले आहेत असें समजावें.

सुपरिंटेंडंटाचे अधिकार चालविणें.

६१. ह्या आक्टांत सुपरिंटेंडंटास दिलेले सर्व अगर कोणतेही अधिकार आणि त्यास सांगितलेलीं सर्व अगर कोणतींही कामें, ह्या संबंधानें स्थानिक सरकार ज्या कोणत्याही दुसऱ्या अमलदारास त्याच्या नांवानें अगर हुद्द्याच्या नात्यानें वेळोवेळीं नेमील, त्यास चालविण्याचा आणि करण्याचा अख्त्यार आहे.

---

## परिशिष्ट.

### कायदे रद्द केले ते.

( कलम २ पाहा. )

| वर्ष. | नंबर. | सरनामा अगर लहान सरनामा. | किती रद्द केला तें. |
|---|---|---|---|
| | | **गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचे आक्ट.** | |
| १८९६ | ८ | मुंबई इलाक्यांतील तुरुंगांवर जास्त चांगला निर्बंध ठेवण्याबाबद. | रद्द केला नाहीं तितका. |
| १८७० | २६ | [ मुंबई इलक्यास लागू नाहीं. ] | |
| १८७४ | १५ | सन १८७४ चा कायद्यांचे स्थानिक व्याप्तीचा आक्ट. | तिसऱ्या परिशिष्टांतील भाग (ब) ह्यांतला जितका अंश सन १८९६ च्या ८ व्या आक्टाबद्दल आहे तितका. |
| १८७८ | १४ | [ मुंबई इलाक्यास लागू नाहीं. ] | |
| १८८६ | २२ | [ मुंबई इलाक्यास लागू नाहीं. ] | |
| १८९१ | १२ | सन १८९१ चा कायदे रद्द करण्याबाबद व सुधारण्याबाबद आक्ट. | दुसऱ्या परिशिष्टांतला जितका अंश सन १८९६ चा आक्ट ८ वा आणि सन १८७० चा आक्ट २६ वा ह्यासंबंधी आहे तितका. |

**मद्रासचे गव्हर्नर इन् कौन्सिल यांचे आक्ट.**

[ मुंबई इलाक्यास लागू नाहींत. ]

**मुंबईचे गव्हर्नर इन् कौन्सिल यांचे आक्ट.**

| वर्ष. | नंबर. | सरनामा अगर लहान सरनामा. | किती रद्द केला तें. |
|---|---|---|---|
| १८७४ | २ | मुंबई शहरांतील व मुंबई इलाक्यांतील तुरुंगांचें नियमन करण्याविषयीं व तेथें व्यवस्था अमलांत आणण्याविषयीं आक्ट. | रद्द केला नाहीं तितका. |
| १८८२ | २ | सन १८७४ चा मुंबईचा आक्ट २ रा सुधारण्याबाबत आक्ट. | सगळा. |
| १८८३ | ४ | फौजदारी काम चालविण्याचे रीतीविषयींच्या कायद्याअन्वयें कैदेच्या शिक्षेस पात्र असणाऱ्या दिवाणी कैद्यांच्या अटकेसंबंधी कायदा सुधारण्याविषयीं आक्ट. | सगळा. |
| १८८७ | १ | सन १८७४ चा आक्ट २ रा हा आणखी सुधारण्याकरितां आक्ट. | सगळा. |

**बंगालचे लेफ्टेनंट गव्हर्नर इन् कौन्सिल यांचे आक्ट.**

[ मुंबई इलाक्यास लागू नाहींत. ]

**महाराणी व्हिक्टोरिया यांच्या कारकीर्दीच्या ३३ व्या सालच्या ३ऱ्या चाप्टर अन्वयें केलेले कायदे.**

[ मुंबई इलाक्यास लागू नाहींत. ]

## हेतु व कारणें यांचें निरूपण.

ब्रिटिश हिंदुस्थानांतील तुरुंगांचें नियमन करण्याबद्दल आणि त्यांत शिस्त ठेवण्याबद्दल हल्लीं चार निरनिराळे आक्ट अमलांत आहेत. हे आक्ट कितीएक महत्वाच्या गोष्टींच्या संबंधानें परस्परांपासून भिन्न आहेत: उदाहरणार्थ, त्यांत सांगितलेले तुरुंगांतील अपराध एकसारखे नाहींत, अशा अपराधांबद्दल करावयाच्या शिक्षा एकसारख्या नाहींत, आणि अशा शिक्षा करण्याचा अधिकार दिलेले अमलदार एकसारखे नाहींत. ह्याचा परिणाम असा झाला आहे कीं, निरनिराळ्या प्रांतांमध्यें तुरुंगांच्या व्यवस्थेच्या भिन्न भिन्न पद्धति चालू होऊन, एकंदर राज्यकारभार चांगल्या रीतीनें चालविण्यास कैदेच्या शिक्षा सारख्या अमलांत आल्या पाहिजेत ही जी गोष्ट अवश्य आहे, ती अगदीं एकिकडे राहिली आहे. सदर्हू चार स्थानिक आक्ट रद्द करून सगळ्या हिंदुस्थानभर तुरुंगांच्या व्यवस्थेची एकसारखी पद्धति घालून द्यावी हा ह्या मसुद्याचा उद्देश आहे.

ह्या मसुद्यास मुख्य आधार, हल्लीं वायव्य प्रांत व अयोध्या, पंजाब, मध्यप्रांत, कूर्ग आणि ब्रह्मदेश ह्यांत अमलांत असलेल्या सन १८७० च्या २६ व्या आक्टाचा (तुरुंगांसंबंधी कायदा सुधारण्याबाबद आक्ट ह्याचा) आहे. सन १८८९ च्या जेल कमिटीचा रिपोर्ट आणि सन १८९२ च्या प्रिझन कानफरन्सचा रिपोर्ट ह्यांचा विचार करून हिंदुस्थान सरकारानें जे मुद्दे काढिले आहेत (हे मुद्दे, होम डिपार्टमेंटांतील तारीख ९ नव्हेंबर सन १८९२ च्या सरकारी ठरावांत आणि तारीख २१ माहे मार्च सन १८९३ चें जें वटपत्र स्थानिक सरकारांस आणि आडमिनिस्ट्रेशनांस पाठविलें आहे त्यांत दाखल केले आहेत) त्यांस कायद्याचें स्वरूप देणें इष्ट वाटल्यावरून, ते मुद्दे ह्या मसुद्यांत सामील केले आहेत.

३. ह्या मसुद्यांतील कांहीं ठरावांसंबंधानें जें कांहीं विशेष सांगणें जरूर आहे तें ह्या पारिग्राफांत सांगितलें आहे.

**कलम.** ३—ह्यांत "तुरुंग," "सब्सिडियरी जेल," "फौजदारी कैदी," "शाबितीचा ठराव झालेला फौजदारी कैदी" आणि "दिवाणी कैदी" ह्या संज्ञांच्या जास्त स्पष्ट व्याख्या केल्या आहेत, आणि "माफीची पद्धति" आणि "हकीकतीचीं तिकिटें" ह्या संज्ञांच्या व्याख्या जास्त दाखल केल्या आहेत.

**कलम** ११.—जिल्हा माजिस्ट्रेटानें तुरुंगाच्या सुपरिंटेंडंटांस हुकुम करावयाचे ते, सेंट्रल जेल आणि इलाका-शहरांतले तुरुंग शिवायकरून इतर तुरुंगांच्या सुपरिंटेंडंटांस मात्र करावे असें ह्या कलमांत ठरविलें आहे.

**कलम** १२.—तुरुंगाची आरोग्य रक्षणसंबंधी व्यवस्था मेडिकल आफिसराकडे सोंपविली आहे.

**कलम** २३.—ह्या कलमांत जो ठराव जास्त दाखल केला आहे, तो, पोलिसानें छळ केल्याचे खोटे आरोप करण्यांत येऊं नयेत ह्यासाठीं अगर पोलिसाकडून तसें दुर्वर्तन झालें असल्यास तें समजून येण्यासाठीं उपयोगी पडण्यासारखा आहे. ह्या कलमांत, स्त्री जातीच्या कैद्यांस तुरुंगांत घेतल्यावर त्यांचा झाडा घेण्याच्या संबंधानें आणि त्यांस तपासण्यासंबंधानें स्वतंत्र ठराव दाखल केला आहे.

**कलम** २६.—ह्यांत, जे लहान वयाचे कैदी उमेदींत आलेले नसतील त्यांस उमेदींत आलेल्या कैद्यांपासून निराळे ठेवण्याबद्दल ठराव आहे.

**कलम** २८.—ह्यांत, कोठडींत कोंडून ठेविलेल्या दरेक कैद्याला मेडिकल आफिसरानें अगर त्याच्या हाताखालील कोणत्याही वैद्यकीय नोकरानें दिवसांतून निदान एकादां जाऊन पाहिलें पाहिजे असें ठरविलें आहे.

**कलम** ३४.—ह्यांत, सक्त मजुरीची शिक्षा झालेल्या फौजदारी कैद्यांकडून एका दिवसांत नऊ तास मात्र काम घ्यावें, आणि फक्त निकडीच्या प्रसंगीं मात्र, सुपरिंटेंडंटाच्या लेखी मंजुरीनें त्यांकडून जास्त काम घ्यावें असा ठराव आहे. कैद्यांच्या प्रकृतीकडे प्रस्तुतपेक्षां जास्त लक्ष देण्यांत यावें ह्यासाठीं, फौजदारी कैद्यांचें वजन त्यांच्या हकीकतीच्या तिकिटांवर दर पंधरवड्यांत निदान एकदां मांडण्यांत यावें, असा ह्या कलमांत ठराव दाखल केला आहे, आणि ज्या कैद्याकडून जें काम करून घेण्यांत येत असेल त्या कैद्याच्या प्रकृतीस त्या कामापासून इजा होऊं नये अशाबद्दलची जबाबदारी मेडिकल आफिसरावर ठेविली आहे.

**कलम ४४.**—हल्लीं अमलांत असलेल्या तुरुंगाविषयींच्या आक्टांत ( हे आक्ट इंग्लंड देशांतील कायद्यांच्याच धोरणावर केलेले आहेत ) ज्या सामान्य तत्त्वांचा समावेश केलेला आहे, त्याच तत्त्वांस अनुसरून हें कलम आहे, आणि शिवाय त्या कलमांत तुरुंगांतल्या मुख्य अपराधांची याद दिलेली आहे. जे कांहीं आणखी थोडेसे अपराध बऱ्याच महत्त्वाचे आहेत असें वाटलें, त्यांचाही ह्या कलमांत समावेश केलेला आहे; असें केलेलें असूनही, तुरुंगाच्या कोणत्याही नियमाचा भंग झाला असतां तो तुरुंगांतील अपराध होतो ह्मणून आणि तुरुंगांत ज्या नियमांप्रमाणें वागावयाचें ते सर्व नियम ह्या आक्टांत दाखल करणें शक्य नाहीं ह्मणून आणि तुरुंगाच्या नियमांत भर घालण्यासाठीं किंवा त्यांत फेरफार करण्यासाठीं कायदा करण्याची जरूरी लागणें इष्ट नाहीं ह्मणून, ज्या नियमांचा भंग केल्यानें कैदी शिक्षेस पात्र होतो ते नियम करण्याचा अधिकार [ स्थानिक ] सरकारांकडे ठेवणें जरूर आहे. तथापि, सगळ्या हिंदुस्थानांतील सर्व कैद्यांस एकसारखी वागणूक मिळावी यासाठीं, तुरुंगाच्या नियमांसंबंधाच्या ह्या कलमाच्या पहिल्या रकमेस, त्या नियमांच्या भंगास शिक्षा ठरवावयाची असल्यास अपराध ठरविणाऱ्या कानूंस गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांची मंजुरी मिळविली पाहिजे, अशी एक अट घालून ठेविली आहे.

**कलम ४५.**—आजपर्यंत, अमलांत असलेल्या कायद्यांत सांगितलेल्या शिक्षांशिवाय इतर प्रकारच्या शिक्षा करण्याची वहिवाट तुरुंगांतून पडलेली आहे; ह्या इतर प्रकारच्या शिक्षा ह्मटल्या ह्मणजे, मार्क (गुण) कमी करणें, कंटाळवाण्या अशा कामावर लावणें, अन्नांत बदल करणें, सवलती काढून घेणें, इत्यादि तुरुंगांवरील अधिकाऱ्यांच्या नजरेवर ठेविलेल्या शिस्तीच्या आणि वागणुकीच्या संबंधाच्या ज्या गोष्टी, त्यांत फेरफार करून, कैद्यास त्रास होईल अशा रीतीनें केलेल्या शिक्षा होत. ह्या वहिवाटीअन्वयें सदोष अशा शिक्षा करण्यांत येऊं नयेत ह्यासाठीं, आणि कोणत्याही प्रकारची शिक्षा करण्यांत आली तरी तिच्याबद्दल योग्यरीतीचा लेखी दाखला दफ्तरीं ठेवण्यांत यावा यासाठीं, ज्या प्रकारच्या शिक्षा करण्याचा अधिकार आहे, त्या सर्व शिक्षा तपशिलवारपणें ह्या मसुद्यांत दाखल करणें इष्ट वाटलें आहे; आणि त्याप्रमाणें, हल्लीं अमलांत असलेल्या कायद्यांत सांगितलेल्या शिक्षा ह्या कलमांत कायम ठेवून, शिवाय, तुरुंगाचे अधिकारी आपल्या नजरेप्रमाणें ज्या शिक्षा आजपर्यंत करीत आले आहेत, त्याही, रकमा (१), (२), (४) व (९) ह्यांत नमूद केल्या आहेत. बाकीच्या रकमांपैकीं कांहीं रकमांमध्येंही कांहीं फेरफार दाखल केले आहेत. रकमा (६), (७) व (८) ह्यांत, एकांत कैद, अलग कैद आणि कोठडीची कैद ह्या ज्या शिक्षा देण्याचा अधिकार आहे, त्या कोठपर्यंत याव्या तें फोड करून सांगितलें आहे. ह्या रकमा, त्या शिक्षा ज्या ज्या प्रांतांमध्यें फायद्याच्या वाटल्या आहेत त्या त्या प्रांतांच्या तुरुंगसंबंधी नियमांतून घेतलेल्या आहेत. रकम (९) हींत, शासनिक अन्नाच्या शिक्षेस एकांत कैदेची शिक्षा जोडून देण्यासंबंधाचा ठराव आहे; रकम (५) अन्वयें, शासनिक अन्नाच्या शिक्षेची कमाल मुदत सन १८७० च्या आक्टाच्या ४८ व्या कलमाच्या २ ऱ्या पोट कलमाप्रमाणें बाहात्तर कलाकांची न ठरवितां शाण्णव कलाकांची ठरविली आहे, आणि हा फरक मुंबई इलाख्यांत अमलांत असलेल्या कायद्यास (सन १८७४ चा मुंबईचा आक्ट २ रा, कलम ३९ ह्यास) अनुसरून केलेला असून तो साधारणपणें सर्वांस पसंत पडला आहे. रकमा (१०) व (११) ह्या, शिक्षेदाखल बिड्या घालण्याच्या संबंधाच्या आहेत. सन १८७० च्या आक्टाअन्वयें, अशा बिड्या घालणें त्या, बंगाल इलाखा खेरीज करून इतर प्रांतांत, त्या आक्टाच्या ४९ व्या कलमाअन्वयें माजिस्ट्रेटाच्या हुकुमानें मात्र घालण्याचा अख्त्यार आहे. तथापि, अलीकडे कितीएक वर्षांपासून शारीरिक शिक्षा करण्याच्या संबंधानें जे कांहीं निर्बंध ठेवण्यांत आले आहेत, आणि शासनिक अन्नाच्या शिक्षेचा वारंवार उपयोग करण्यास ज्या हरकती घेण्यांत आल्या आहेत, त्यामुळें, दांडग्या आणि निर्ढावलेल्या कैद्यांस निर्बंधांत ठेवण्याचे आणखी कांहीं उपाय सुपरिंटेंडंटांच्या हातांत ठेवणें इष्ट वाटल्यावरून बिड्यांच्या शिक्षेची योजना केली आहे. रकम (१२) हीअन्वयें, जी एक लहानशी शिक्षा चोऱ्या आणि तुरुंगांतल्या कपड्यांचा नाश करणें ह्यांबद्दल बंगाल इलाख्यांत उपयुक्तशी अनुभवास आली आहे, ती ह्या मसुद्यांत जास्त दाखल केली आहे. स्त्री जातीचे कैदी आणि दिवाणी कैदी ह्यांस हातबिड्यांची अगर पायबिड्यांची शिक्षा आणि फटके मारण्याची शिक्षा करूं नये असें मुद्दाम ठरविलें आहे.

**कलम ४६ ते ५०.**—ह्यांत जे ठराव दाखल केले आहेत, ते, हिंदुस्थान सरकारानें सन १८९२ च्या आरंभीं, सगळ्या हिंदुस्थानासाठीं एक सुधारलेला आणि ज्यांत निरनिराळ्या प्रांतांतले ठराव एकत्र केले आहेत असा कायद्याचा खर्डा तयार करण्याच्या कारणांसाठीं तुरुंगाच्या व्यवस्थेविषयीं विशेष माहिती असणाऱ्या सर्व प्रांतांतल्या लोकांची जी एक सभा भरविली होती, त्या सभेनें सुचविलेले आहेत.

**कलम ५१.**—हें कलम, सन १८७० च्या आक्टांतलें ४९ वें कलम होय. मात्र, माजिस्ट्रेटानें इन्साफ केल्यानंतर जादा शिक्षा द्यावयाची ती सन १८७० च्या आक्टांत साहा महिन्यांपर्यंतची ठरविली आहे, ती वाढवून ह्या कल-

मांत एकवर्षपर्यंतची केली आहे. जर एकाद्या माजिस्ट्रेटाचें, कैद्याच्या अपराधाच्या मोठेपणाविषयींचें मत सुपरिंटेंडंटाच्या मताहून निराळें होईल, तर त्या माजिस्ट्रेटास आपणास योग्य वाटेल ती तुरुंगांतली शिक्षा देण्याचा अधिकार असावा म्हणून, त्या अर्थाचाही एक ठराव ह्या कलमांत दाखल केला आहे.

**कलम ५४.**—हें, सन १८६१ चा आक्ट ५ वा, पोलीस अक्ट, ह्याच्या २९ व्या कलमावरून घेतलेलें आहे; आणि त्याचा उपयोग होईल असें वाटतें.

**कलमें ५५ व ५६.**—हीं कलमें, मद्रासेंत ज्या कानू अमलांत आहेत, त्यांच्या आधारें तयार केलीं आहेत. ह्या कलमांस बहुतेक सर्व स्थानिक सरकारांनीं व आडमिनिस्ट्रेशनानीं पसंती दर्शविली आहे.

**कलमें ५८ व ५९.**—ह्या मसुद्यांत ह्यापूर्वींच्या कलमांत ज्या बाबतींबद्दल ठराव केलेले नाहींत, त्याबाबतींचें नियमन करण्यासाठीं जरूर लागतील त्या कानू करण्याबद्दल ह्या कलमांत तजवीज केलेली आहे.

तारीख ११ माहे जानेवारी सन १८९४.

(सही) ए. पी. म्याकडोनेल.

(True Translation.)
M. A. BAIG,
Oriental Translator to Government.



BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.